जा.क्र.मसंके / भासुयो /३९४/ २०२२
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
ता. दापोली. जि. रत्नागिरी.
दिनांकः— 10 AUG 2022

प्रति,

________________________

________________________

________________________

विषयः— मत्स्यबीज खरेदी करण्यासाठी दरपत्रक देणेबाबत.

महोदय,

वरील विषयास अनुसरून मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत भाजीपाला सुधार योजना वाकवली च्या बिजोत्पाद, पांगारी प्रक्षेत्रावरील शेततळयामध्ये मत्स्यबीज करावयाचे असून सदर मत्स्यबीज खरेदी करण्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | परिमाण |
|---|---|---|
| १. | मत्स्यबीज | ५००० नग<br>( ५ ग्रॅम वजन असलेल्या माश्याचा प्रति नगाचा दर देण्यात यावा.) |

वरील साहित्याचे दरपत्रक बंद लखोटयात मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली ता. दापोली जि. रत्नागिरी यांचे नावे कार्यालयात दिनांक २६/०८/२०२२ पर्यंत पोहचेल असे पाठवावे.

उपरोक्त तपशिलातील अटी व शर्ती खालीलप्रमाणेः

१. दरपत्रक देताना लखोटयावर 'भाजीपाला सुधार योजना मत्स्यबीज खरेदी करण्याचे दरपत्रक' असे स्पष्ट नमुद करावे. दिनांक २६/०८/२०२२ नंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
२. दरपत्रकावर जी.एस.टी. क्रमांक नमुद करावा. जी.एस.टी. लागू होत नसल्यास तसे प्रमाणपत्र सादर करावे तसेच पॅनकार्डची छायांकित प्रत सोबत जोडणे बंधनकारक राहील.
३. सदर मत्स्यबीज मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली भाजीपाला सुधार योजना येथे विहित मुदतीत कार्यालयास पोहोच करणे आवश्यक आहे.
४. वरील मत्स्यबीज खरेदी करणेबाबतचे एक किंवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारण्याचा/रद्द करण्याचा तसेच खरेदी संख्या कमी जास्त करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार राखून ठेवीत आहेत.
५. वरील मत्स्यबीज देयकामध्ये बँक खात्याची छायांकित प्रत, पॅनकार्ड, आधारकार्ड जोडणे आवश्यक आहे. देयकाची अदायगी रक्कम बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.
६. विहित मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक २९/०८/२०२२ रोजी या कार्यालयात उघडण्यात येतील.
७. टपाल खात्याच्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
८. अधिकृत विक्रेते अथवा उत्पादक असल्यास तसे प्रमाण पत्र जोडावे. अधिकृत दरसूची जोडावी.
९. दरपत्रकामध्ये संबंधीत सर्व करांचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

(सही)

भाजीपाला विशेषज्ञ,
भाजीपाला सुधार योजना,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली